Gramin Krishi Mausam Sewa
Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

# Agromet Advisory Bulletin

**Date : 08-01-2021**

**Weather Forecast of SAONER Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2021-01-08(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2021-01-09 | 0.0 | 30.8 | 17.7 | 52 | 31 | 8.0 | 73 | 3 |
| 2021-01-10 | 0.0 | 31.5 | 18.3 | 53 | 32 | 6.0 | 90 | 3 |
| 2021-01-11 | 0.0 | 31.8 | 17.9 | 57 | 31 | 7.0 | 34 | 6 |
| 2021-01-12 | 0.0 | 32.2 | 18.3 | 59 | 30 | 8.0 | 19 | 4 |
| 2021-01-13 | 0.0 | 31.2 | 17.5 | 53 | 32 | 9.0 | 28 | 1 |

## Weather Summary/Alert:

In Saoner block, as per forecast given by, RMC, Nagpur, sky will be partly to partially cloudy is forecasted.

सावनेर तालुक्यामध्ये, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## General Advisory:

Due to continuous cloudy weather and high humidity, the crop should be monitored from time to time considering the possibility of pest infestation on the rabi season crop and if pest or disease infestation is observed, it should be managed with recommended pesticides or fungicides. If mature arhar or other crop has been harvested, it should be stored in a safe place.

सततचे ढगाळ हवामान आणि जास्त आद्रतेमुळे रबी हंगामातील पिकावर कीड रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता लक्षात घेता वेळोवेळी पिक निरीक्षण करावे आणि कीड किंवा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास शिफारशीत असलेल्या कीटकनाशक किंवा बुरशीनाशकांद्वारे व्यवस्थापन करावे. परिपक्व झालेल्या तूर किंवा इतर पिकाची कापणी झाली असल्यास सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

## SMS Advisory:

For management of rust and leaf blight disease in wheat, spraying should be done of Mancozeb 75 % WP @ 20 to 25 gm per 10 liters of water.

गहू पिकामध्ये तांबेरा आणि पानावरील करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी मॅनकोझेब ७५ % डब्ल्यूपी २० ते २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| WHEAT | According to soil moisture status and crop needs, wheat crop should be irrigated at maximum tillering stage (30-35 days after sowing), late jointing (45-50 days after sowing) and flowering stage (65-70 days after sowing) depending on soil moisture and moisture content. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
| --- | --- |
| | गहू पिकास जमिनीतील ओलावा आणि मगदुर व पिकाची गरज लक्षात घेता पिक अवस्थेनुसार, जास्तीत जास्त फुटवे फुटण्याची अवस्था (पेरणीनंतर ३०-३५ दिवस), कांडी धरण्याची उशिरा अवस्था (पेरणीनंतर ४५-५० दिवस) आणि फुलोरा अवस्था (पेरणीनंतर ६५-७० दिवस) मध्ये असताना सिंचन करावे. |
| WHEAT | If the incidence of pink stem borer is observed in wheat field, foliar spray of quinalphos 25 EC @ 800 ml /acre as soon as pink stem borer is seen. Irrigation also helps in reducing the pink stem borer damage. |
| | गव्हाच्या शेतात गुलाबी रंगाच्या खोड अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ % ईसी ८०० मिली / एकर या प्रमाणात फवारणी करावी. पिकास ओलीत केल्यास सुद्धा कोड किडीमुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होते. |
| WHEAT | In case of infestation of aphids in wheat crop is notice due cloudy weather, spray with Thimethoxam 25% WG @ 10 to 15 gm or Quinalphos 25 % EC 40 ml per 10 liters of water for management. |
| | सद्य परिस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे गहू पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी थायमेथोक्झाम २५ % डब्ल्यूजी १० ते १५ ग्राम किंवा क्विनालफॉस २५ % प्रवाही ईसी ४० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| WHEAT | In wheat crop due to cloudy weather, in case of infestation of rust and leaf blight disease is notice spraying should be done of Mancozeb 75 % WP @ 20 to 25 gm per 10 liters of water. |
| | सद्य परिस्थितीतील ढगाळ वातावरणामुळे गहू पिकामध्ये तांबेरा आणि पानावरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅनकोझेब ७५ % डब्ल्यूपी २० ते २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| WHEAT | Toxic bait should be used for rat management in wheat crop. To make a poisonous bait, mix 49 parts of cereal flour, a little bit of edible oil and 1 part of bromadiolone 0.25 % CB. Spoon the bait into a plastic bag and place it in a live field bin or near the bin. |
| | गहू पिकामध्ये उंदीर व्यवस्थापनासाठी विषयुक्त आमिषाचा वापर करावा. विषयुक्त आमिष तयार करण्यासाठी धान्याचा भरडा ४९ भाग, थोडे गोडे तेल व १ भाग ब्रोमाडीओलोन ०.२५ % सीबी एकत्र मिसळावे. चमचाभर आमिष प्लास्टिकच्या पिशवीत टाकून शेतातील जिवंत बिळामध्ये टाकावे किंवा बिलाजवळ ठेवावे. |
| PIGEON PEA (RED GRAM/ARHAR) | In the view of present cloudy weather, In pigeon pea, if incidence of pod borer 3 per plant, pod fly 1-3 larvae or 5 to 10 per cent of damage, 20 bird stops should be set up per hectare. 15 days after first spraying, second spraying should be done on Chlorantraniliprole 18.5 SC 3 ml or Indoxacarb 15.8% EC 6.6 ml or lambda-cyhalothrin 5 % EC 10 ml or Flubendiamide 20 % WG 5 gm or Emamectin benzoate 5 % SG 4.4 gm or Chlorantraniliprole 9.30 per cent. + Lambda-Cyhalothrin 4.60% ZC mixed in 4 ml per 10 liters of water. |
| | सद्य स्थितीत ढगाळ हवामानामुळे, तूर पिकामध्ये शेंगा पोखरणारी अळी ३ प्रती झाड किंवा पिसारी पतंगाची अळी १ ते ३ प्रती झाड किंवा ५ ते १० टक्के शेंगांचे नुकसान आढळल्यास प्रती हेक्टर २० पक्षी थांबे उभारावेत, पहिल्या कीटकनाशकाच्या फवारणीनंतर १५ दिवसांनी क्लोरअँट्रानीलिप्रोल १८.५ टक्के एस.सी. ३ मिली किंवा इंडोक्झीकार्ब १५.८ टक्के ईसी ६.६ मिली किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ५ टक्के ईसी १० मिली किंवा फ्ल्युबेंडामाईड २० टक्के डब्ल्यूजी ५ ग्राम किंवा इमामेक्टिन बेंझोएट 5% एसजी ४.४ ग्राम किंवा क्लोरअँट्रानीलिप्रोल ९.३० टक्के एस.सी. + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ४.६० टक्के झेडसी ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| COTTON | Farmers are also advised to remove cotton stalks out of field after picking of cotton. Ratooning should be discouraged. Catching Pink bollworm adults in ginning mills and other storage places should be done to reduce carry over in next season. |
| | |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | कापसाच्या शेवटच्या वेचणी नंतर झाडे उपटून टाकावीत. कपाशीमध्ये फरदड घेणे टाळावे. कापूस गीनिंग मिल आणि इतर कापूस साठवलेल्या जागी मध्ये गुलाबी बोंड अळीचे पतंग कामगंध सापळ्याच्या सहाय्याने पकडून नष्ट करावे. |
| COTTON | Picking of cotton should be done preferably in morning hours. Cotton should be dried in shed. Store cotton at dry places. Cotton picked from initial 3 pickings (Rainfed) and middle 4 pickings (Irrigated) having good quality. Therefore, if possible store it separately. |
| | परिपक्व व पूर्ण फुटलेल्या बोंडातील कापूस शक्यतोवर सकाळच्या वेळेत वेचून घ्यावा. वेचलेला कापूस सावलीत वाळवावा व कोरड्या ठिकाणी त्याची साठवणूक करावी. कोरडवाहू कपाशीच्या पहिल्या तीन वेचण्याचा तसेच बागायती कपाशीच्या मधल्या चार वेचणींचा कापूस दर्जेदार असतो. हा कापूस शक्यतोवर वेगळा साठवावा. |
| COTTON | Cotton: Application of insecticides can be taken up only when minimum 8 -10 green bolls per plant and new flush seen on the plant. If more than 60 % bolls are infested and no new flush seen on the plant, farmers advised to terminate the crop and go for Rabi crop. |
| | कपाशी: कपाशी पिकामध्ये किटकनाशकाची फवारणी हि झाडावर कमीत कमी ८-१० हिरवी बोंडे प्रती झाड किंवा नवीन पालवी असेल तरच करावी. कपाशीमध्ये ६० % बोंडे पेक्षा जास्त बोंडे कीड ग्रस्त झाले असल्यास आणि झाडावर नवीन पालवी नसल्यास कपाशीचे पिक काढून रबी पिकाची लागवड करावी. |
| COTTON | Cotton: If the infestation of pink bollworm crosses ETL, take up spray of Thiodicarb 75 %WG 20 gm or spray Lambda Cyhalothrin 5 EC @ 10ml or Thiodicarb 75 % WP @ 20 g or Cypermethrin 10 EC @ 10 ml or Profenophos 30 ml or Emamectin benzoate 5 SG @ 5g per 10 litre of water. |
| | कपाशी: कपाशीमध्ये गुलाबी बोंड अळी/प्रादुर्भावाने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी थायोडीकार्ब ७५ % डब्लूपी २० ग्राम किंवा लँबडासायहॅलोथ्रिन ५ ईसी १० मिली किंवा सायपरमेथ्रीन १० ईसी किंवा प्रोफेनोफॉस ३० मिली किंवा ईमामेक्टीन बेन्झोएट ५ एसजी ५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| COTTON | Due to cloudy weather condition, there is a chance of increase in incidence of pod borer in chickpea. It is advised to spray 5% Neem ark and erect T-shaped bird perches at several places in the field. Monitor the chickpea field regularly. If wilt affected plants observed, uproot it and destroy it immediately. In case of gram pod borer crosses ETL, spray Quinalphos 25 % EC in 20 ml or Emamectin benzoate 5 % SG 4.4 gm per 10 liters of water. |
| | सद्य परिस्थितील ढगाळ हवामानामुळे हरभरा पिकामध्ये घाटे अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, व्यवस्थापनासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी तसेच शेतात बऱ्याच ठिकाणी T आकाराचे पक्षी थांबे उभारावेत. पिकामध्ये मर रोग ग्रस्त झाडांचे निरीक्षण करावे व प्रादुर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. हरभरा पिकामध्ये घाटे अळीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली किंवा इमामेक्तिन बेन्झोएट ५ टक्के एसजी ४.४ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| GROUNDNUT | If irrigation water is available, summer groundnut should be sown in the second fortnight of January under Broad bed furrow system and sprinkler irrigation system should be used. Use 125 kg seed per hectare of TAG-24 or SB-11 variety. Seed treatment of Trichoderma 5 gm, Rhizobium 25 gm, and PSB 25 gm should be done per kg of seed. |
| | ओलिताचे पाणी उपलब्ध असल्यास उन्हाळी भुईमुगाची पेरणी जानेवारी च्या दुसऱ्या पंधरवड्यात रुंद वाफा व सरी पद्धतीने तुषार सिंचनाखाली करावी. टीएजी- २४ किंवा एसबी-११ या जातीचे हेक्टरी १२५ किलो बियाणे वापरावे. प्रती किलो बियाण्यास ट्रायकोडर्मा ५ ग्राम, रायझोबियम २५ ग्राम, पीएसबी २५ ग्राम या जीवाणू संवर्धनाची बीज प्रक्रिया करून पेरणी करावी. |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| GROUNDNUT | In the view of present cloudy weather, if the occurrence of rust and tikka (leaf spot), spraying should be done of Tebuconazole 25% WG 500-750 gm per hectare mix with 500 litre) of water. (10 to 15 gram/10 litre of water).<br>सद्य स्थितीत ढगाळ हवामानामुळे भुईमुग पिकावरील तांबेरा आणि टिक्का या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणाकरिता टेबूकोनाझोल २५ टक्के डब्ल्यू. जी. ५०० ते ७५० ग्राम प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून (१० ते १५ ग्राम प्रती १० लिटर पाणी) फवारणी करावी. |
| GROUNDNUT | In groundnut crop leaf folder or leaf miner, when ETL cross (2 larva per plant or 10 percent leaves are damage) is notice due to present cloudy condition, then apply spraying of Quinalphos 25 % EC, 1 litre/hectare mix with 500 litre of water (20 ml/10 litre of water) or Deltamethrin 2.8 % EC, 500 ml per hectare in 400-600 litre of water (10ml/ 10 litre of water).<br>सद्य स्थितीत ढगाळ हवामानामुळे भुईमुग पिकामध्ये पाने पोखरणारी अथवा गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव दोन अळ्या प्रती झाड किंवा झाडाच्या मध्यवर्ती भागात १० टक्के पाने पोखरलेली अशी आर्थिक नुकसानीची पातळी आढळल्यास क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही १ लिटर प्रती हेक्टर ५०० लिटर पाण्यात मिसळून (२० मी.ली./ १० लिटर पाणी) किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही ५०० मी.ली. प्रती हेक्टरी ४००-६०० लिटर पाण्यात मिसळून (१० मी.ली./ १० लिटर पाणी) फवारणी करावी. |

## Horticulture Specific Advisory:

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| ORANGE | For orange fruit trees as per needs of crop the water requirement is 7-30, 44-72, and 82-102 litres per day for tree of age 1-4, 5-7, 8 years old and above, respectively should be met with drip system. Use double ring method if there is no drip system.<br>संत्रा पिकाच्या झाडाच्या गरजेनुसार आवश्यकता भासल्यास ठिबक संच असल्यास १ ते ४, ५ ते ७ व ८ वर्षावरील झाडांना अनुक्रमे ७ ते 30, ४४ ते ७२ आणि ८२ ते १०२ लिटर प्रती दिवस जमिनीनुसार पाणी द्यावे. ठिबक संच नसल्यास दुहेरी आळे पद्धतीने ८ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. |
| ORANGE | Mulching should be done in tree basin if not done earlier. For mulching grass, wheat husk near the tree trunk can be utilized start irrigation to the orchard for initiation of Ambia bahar as per the type of soil & stress received by the trees.<br>संत्रा पिकाच्या झाडाच्या बुडाजवळ पूर्वी केले नसल्यास आच्छादन करावे. आच्छादन करण्यासाठी गवत, गव्हाचा भुसा झाडाच्या खोडाजवळ टाकावा. |
| ORANGE | Infestation of citrus pyslla occurs with the outburst of new leaves in Ambia bahar. The pest can cause 100 per cent flower drop if not controlled. The pest causes “die back” and “Greening” disease in affected trees causing “slow decline”. It can be controlled by spraying Dimethoate 2 ml or Acephate 2 g or Imidacloprid 0.5 ml per litre water at bud burst stage. Second spray should be carried after 10 days interval. Change the pesticides in subsequent sprays.<br>फळ बागेमध्ये पाणी दिल्याबरोबर ताण तुटतो व नवीन पालवी किंवा नवतीची सुरुवात होते. या वेळी सिट्रस सिला व त्याची पिल्ले पानातील रस शोषून घेतात. नवतीच्या पानाची गळ होऊन फांद्या सुकतात व फळधारने वर अनिष्ठ परिणाम होतो. ह्या किडीद्वारे “ग्रीनींग” या रोगाचा प्रादुर्भाव होतो. या किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमेथोएट २ मिली किंवा एसिफेट २ ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड ०.५ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून नवीन नवतीवर फवारणी करावी. दुसरी फवारणी १० दिवसानंतर कीटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. |

## Live Stock Specific Advisory:

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| BUFFALO | Animals should be vaccinated against foot and mouth disease. |
| | जनावरांना तोंड खुरी व पाय खुरी रोगाविरुद्ध लस टोचावी. |

**Others (Soil / Land Preparation) Specific Advisory:**

| Others (Soil / Land Preparation)(Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| GENERAL ADVICE | Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |